**संफौ. खटला क्र.२९१/२०२५**

**निशाणी क्र.१२**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | हुसेन फत्रुसाब तांबोळी, |
| **वय** | : | ५२ वर्षे, **काम** : बांगडी व्यवसाय, |
| **राहणार** | : | जवळगा, ता. देवणी, जि. लातूर. |

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

पोलिसांनी मला दि.२३/१०/२०२५ रोजी आरोपीच्या घरी बोलावले नाही आणि माझ्यासमक्ष काहीही केलेले नाही. त्यांनी तेथे माझी कोऱ्या कागदावर सही घेतली. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. मला पंचनाम्यातील मजकूर माहिती नाही. सदर सहीला नि.१३ देण्यात येते.

०२. **साक्षीदार पूर्वीच्या कृतीवर कायम नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

०३. दि.२३/१०/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० ते ५.३० च्या दरम्यान पोलिसांनी त्याच्यासमक्ष आरोपीच्या घरासमोरील जागेतून आरोपी कडून देशी दारूच्या ११ बाटल्या जप्त केल्या आणि त्याबाबत पंचनामा तयार केला असे घडले नाही. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीसोबत आलो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एस.पी. कांबळे यांनी नाकारला ::**

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत — सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.०४/०६/२०२६.